श्री.नरेंद्र भोईटे, सह संचालक,अहमदनगर यांचा New York, Los Angeles, Fresno, Fresno Orlando (United State) येथे दि.१६/०९/२०२४ ते दि.२३/०९/२० २४ या कालावधीतील "Leadership & Managerial Skills, Management & Business Administration (ST ०२५)"या प्रशिक्षणामध्ये सहभागी होणेस परवानगी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग
शासन निर्णय क्रमांक : बाष्पके-०६२४/प्र.क्र.७९/काम.१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ११ जुलै, २०२४

संदर्भ : १) अतिरिक्त संचालक,प्रशिक्षण, राष्ट्रीय सचिवालय प्रशिक्षण व विकास संस्था,नवी दिल्ली यांचे पत्र क्र.ref.no.KCP/SAC/Let/६३-३३-९६३दि.१२/२/२०२४.
२) कार्यासन अधिकारी, उद्योग,ऊर्जा,कामगार व खनिकर्म विभाग यांचे पत्र क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.४०/काम.९,दि.१/४/२०२४.
३) संचालक,बाष्पके यांचे पत्र क्र.एसबी-१/जिएल /२०२४/७९०१,दि.१६/५/२०२४.
४) सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र.परदौ-१४२०/प्र.क्र.२६/११,दि.१/२/२०२१.
५) संचालक,बाष्पके यांचे पत्र क्र.एसबी-१/जिएल-१९ /२०२४/९४८८,दि.२०/६/२०२४.

प्रस्तावना :-

उपरोक्त संदर्भीय क्र.१ येथील दि.१२/२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये, राष्ट्रीय सचिवालय प्रशिक्षण व विकास संस्था,नवी दिल्ली यांचेमार्फत "Knowledge Co-creation Programme (Internation Study Tour) call for nominations" या विषयासंदर्भात New York, Los Angeles, Fresno, Fresno Orlando (United State) येथे दि.१६/०९/२०२४ ते दि.२३/०९/२०२४ या कालावधीतील "Leadership & Managerial Skills, Management & Business Administration (ST ०२५)" या प्रशिक्षण आयोजित केले आहे.

२. यानुषंगाने उक्त संदर्भीय क्र.२ येथील दि.१/४/२०२४ पत्रास अनुसरून राष्ट्रीय सचिवालय प्रशिक्षण व विकास संस्था,नवी दिल्ली यांनी सदरहू अभ्यास दौऱ्याकरीता नामनिर्देशन मागविण्यात आलेले होते. त्याअनुसार संदर्भीय क्र.३ व ५ येथील पत्राव्दारे संचालक,बाष्पके यांनी सदरहू अभ्यास दौरा हा केंद्र शासनाने सर्व अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षणाचा जो विषयांकित अभिनव कार्यक्रम आखला आहे, त्या प्रशिक्षणाव्दारे आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध बाबींचे व्यवस्थापन, त्यांना सूक्ष्म अभ्यास व आपल्याकडील व्यवस्थापन यांच्यातील तुलनात्मक अभ्यास करून, त्याप्रमाणे बाष्पके संचालनालयातील व्यवस्थापनात सुधारणा करता येतील.

३. सबब, सदरहू अभ्यास दौऱ्याकरीता शासनामार्फत श्री.नरेंद्र भोईटे, सह संचालक, बाष्पके, अहमदनगर यांना New York, Los Angeles, Fresno, Fresno Orlando (United State) येथे पाठविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

श्री.नरेंद्र गणपतराव भोईटे,सहसंचालक, बाष्पके,अहमदनगर यांना "Knowledge Co-creation Programme (Internation Study Tour) call for nominations" या विषयासंदर्भात New York, Los Angeles, Fresno, Fresno Orlando (United State) येथे **दि.१६/०९/२०२४ ते दि.२३/०९/२०२४** या कालावधीतील "Leadership & Managerial Skills, Management & Business Administration (ST ०२५)" या प्रशिक्षणासाठी सहभागी होण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदरहू दौऱ्याचा खर्च हा श्री.नरेंद्र गणपतराव भोईटे,सहसंचालक, बाष्पके,अहमदनगर हे स्वत: करणार असल्याने, या व्यतिरिक्त खर्चाचा भार शासनावर येणार नाही, याची दक्षता घ्यावी.

३. सदरहू विदेश दौऱ्याच्या कालावधीत संपुर्ण सुरक्षितता,देखभाल संबंधित देशाच्या नियमांचे पालन करण्याची जबाबदारी ही संबंधित अधिकाऱ्याची राहील.

४. वरीलप्रमाणे मान्यता दिलेल्या देशा व्यतिरिक्त इतर कोणत्याही देशास भेट देता येणार नाही.

५. तसेच,दौऱ्यांच्या कालावधीत संबंधित अधिकाऱ्याकडून महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम,१९७९ मधील कोणत्याही तरतुदींचा भंग केला जाणार नाही, याची दक्षता घ्यावी.

६. या प्रकरणी कोणत्याही संस्थेकडून प्रवास खर्च, विदेशी वास्तव्याच्या खर्च वा अन्य कोणत्याही प्रकारचे अदरातिथ्य स्वीकारू नये.

७. सदरहू शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या उपरोक्त संदर्भीय क्र.४ येथील दि.१/२/२०२१ रोजीच्या शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार शासन मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०७१११८०१५८९४१० असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

SHILPA GIRISH CHAUDHARI

Digitally signed by SHILPA GIRISH CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT, 2.5.4.20=c302cfaa4da0b2d72c4622c85421df78e53b25c22ce3da5d53104e3a7a72c8ce, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F91D4AFBD1E1BF5BE92C2964CCBA9768C05DC4A771EA96939883ABF6C9F5A37E, cn=SHILPA GIRISH CHAUDHARI
Date: 2024.07.11 18:12:58 +05'30'

(शिल्पा चौधरी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव
२. मा. प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक
३. संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई
४. उपसचिव/ अवर सचिव (काम-१), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग
५. श्री.नरेंद्र भोईटे, सह संचालक,बाष्पके,अहमदनगर यांना (बाष्पके संचालनालयामार्फत)
६. निवड नस्ती (काम-१)